**निर्यात विषयक** जिल्हा **कार्यबल समिती** सभा दिनांक १६/१२/२०२० चे इतिवृत्त

दिनांक १६/१२/२०२० रोजी दुपारी **३.००** वाजता जिल्हा उद्योग केंद्र,गोंदिया कार्यालयात महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली निर्यात विषयक जिल्हा कार्यबल समिती सभा संपन्न झाली. सभेत खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

१. श्री . प्रविण नलावडे, डेप्युटी डायरेक्टर फॉरेन ट्रेड,पूणे (व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे)
२. श्री . गणेश घोरपडे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी,गोंदिया
३. श्री . निरज कायरकर, प्रतिनिधी व्यवस्थापक,जिल्हा अग्रणी बँक,गोंदिया
४. श्री . निरज जागरे, डी डी एम नाबार्ड,गोंदिया

सभेमध्ये सर्वप्रथम दिनांक **०५**/११/२०२० रोजी मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या निर्यात प्रचालन समिती सभेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने निर्यात संबंधीची माहीती व निर्यात होणा-या उत्पादक व उत्पादनांची माहीती संकलन करण्याविषयी चर्चा करण्यात आली.

सभेत महाव्यवस्थापक यांनी जिल्हयात प्रामुख्याने निर्यात होणारे उत्पादन म्हणजे तांदूळ व लाख यांचे कडून अद्याप निर्यात विषयी आकडेवारी प्राप्त झाली नसल्याचे सांगीतले.

श्री गणेश घोरपडे यांनी शेती उत्पादने निर्यात वाढीसाठी शेतकरी / FPO यांचेकरिता awareness कार्यक्रम व प्रशिक्षणाची गरज असल्याचे सांगीतले

श्री .निरज कायरकर प्रतिनिधी जिल्हा अग्रणी बँक यांना EPC योजने अंतर्गत 5% व्याज प्रोत्साहन घेणा-या निर्यातदारांची माहीती पुरविण्याची सुचना महाव्यवस्थापक यांनी केली. तसेच त्यांनी तांदूळ व लाख निर्यातदार यांची माहीती संबंधित संघटनांना पुरविण्याविषयी कळविले असल्याचे सांगीतले.

श्री . प्रविण नलावडे डेप्युटी डायरेक्टर फॉरेन ट्रेड यांनी सदरची माहीती संकलन झाल्यावर जिल्हयाचा निर्यात कृति आराखडा अंतीम करण्यास मदत होईल असे सांगीतले. तसेच सदस्यांकडून निर्यातविषयक माहीती प्राप्त करुन् घेण्याची सूचना केली.

महाव्यवस्थापक यांनी निर्यातवाढी करिता outreach कार्यक्रम घ्यावयाचे असल्याचे सांगीतले. त्यावर श्री . प्रविण नलावडे यांनी सध्याचे कोवीड प्रादुर्भावा मुळे सदर कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत सूचना केली.

महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र,गोंदिया